**वाचा**:-१) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ),पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक रा.भू.अ.आ.का.४ /प्र.क्र. २४ /२०१३ डेटा बेस ॲडमिनीस्ट्रेटर /१३ पुणे दिनांक २५/०७/२०१३

२) लेखा व कोषागार अधिकारी कनिष्ठ स्तर मुंबई यांचेकडील दिनांक १७/०७/२०१३ रोजीचा ई-मेल संदेश

---

क्र./ रा.भू.अ.आ.का.४ / प्र.क्र. १७
आज्ञावलींतील रजिस्ट्रेशन / १३
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख( महाराष्ट्र राज्य ),पुणे
यांचे कार्यालय ,पुणे.
दिनांक - २५ /०७/२०१३

# परिपत्रक

**विषय :- ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट ,डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर ,मंडल अधिकारी व तलाठी यांचे ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावली मध्ये रजिस्ट्रेशन करणे बाबत .**

ई-महाभुमि तथा राष्ट्रीय भुमि अभिलेख आधुनिकिकरण कार्यक्रम अंतर्गत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख ,पुणे यांनी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पुणे यांचे मार्फत फेरफार प्रक्रियेचे संगणकीकरण करण्यासाठी ई-फेरफार आज्ञावली व तलाठी दप्तराचे संगणकीकरण करण्यासाठी ई-चावडी आज्ञावली विकसित केल्या आहेत.महाराष्ट्र शासनाच्या महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. रा.भू.अ.२०१३/ प्र.क्र.२/ल-१ दिनांक ४/१/२०१३ व शासन निर्णय क्र. रा.भू.अ.२०१३/ प्र.क्र.३२/ल-१ दिनांक २३/१/२०१३ अन्वये अनुक्रमे ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावली राज्यभर लागु करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावली स्टेट डेटा सेंटरवर ठेवण्यात आल्या आहेत.सदर ई-फेरफार व ई-चावडी आज्ञावलींचा वापर करता यावा यासाठी राज्यातील सर्व डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट , डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर , मंडल अधिकारी व तलाठी यांचे ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींमध्ये रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे.

**रजिस्ट्रेशनची आवश्यकता** :-

राज्यातील सर्व तलाठी व मंडल अधिकारी यांना ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींचा अधिकृत वापर करता यावा तसेच ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींचा अनाधिकृत वापर टाळता यावा यासाठी राज्यातील सर्व तलाठी व मंडल अधिकारी यांचे ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींमध्ये रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे.

रजिस्ट्रेशनव्दारे वरीष्ठ अधिका-यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी ,कर्मचारी यांना आज्ञावलींच्या वापरासाठी प्राधिकृत करावयाचे आहे.

तलाठी व मंडल अधिकारी यांचे आज्ञावलींमध्ये रजिस्ट्रेशन झालेखेरीज त्यांना डाटा करेक्शन युटीलीटी मधील तलाठी ॲथॅानटीकेशन हा भाग वापरुन कार्यवाही करता येणार नाही. तसेच म्युटेशन अपडेशन मॉडयुलचा वापर करुन प्रलंबीत फेरफार नोंदी संगणकीकृत ७/१२ च्या डाटाबेसमध्ये घेऊन डाटाबेस अद्यावत करता येणार नाही. यासाठी राज्यातील सर्व तलाठी व मंडल अधिकारी यांचे ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींमध्ये रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे.

**कोणी कोणाचे रजिस्ट्रेशन करावे** :-

राज्यातील सर्व डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट यांचे रजिस्ट्रेशन जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ( म.राज्य) , पुणे यांचे मार्फत करण्यात आले आहे.डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट यांनी त्यांचे जिल्हयातील डाटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांचे रजिस्ट्रेशन करावयाचे आहे.तर डाटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांनी त्यांचे तालुक्यातील सर्व तलाठी व मंडल अधिकारी यांचे रजिस्ट्रेशन करावयाचे आहे.

**रजिस्ट्रेशन करण्यासाठीची कार्यपद्धती** :-

या कार्यालयाकडून पुरविण्यात आलेल्या युजर क्रियेशन मॉडयुलचा वापर करुन रजिस्ट्रेशन करण्याची कार्यवाही करावयाची आहे. रजिस्ट्रेशन करण्याची कार्यवाही खालील तीन टप्प्यात करावयाची आहे.

I लॉगिन आयडी तयार करणे

II पासवर्ड तयारकरणे

III हाताच्या बोटांचे ठसे नोंदविणे

**I) लॉगिन आयडी तयार करणे** :-

वित्त व लेखाविभागाने प्रत्येक शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी सेवार्थ क्रमांक तयार केलेले आहेत. सदर सेवार्थ क्रमांकाचा वापर करुन अधिकारी कर्मचारी यांचे ई -चावडी व ई-फेरफार

आज्ञावलींच्या वापरासाठी लॉगईन आयडी तयार करावयाचे आहेत.त्यासाठी राज्यातील सर्व तलाठी,मंडल अधिकारी,नायब तहसिलदार,तहसिलदार,इत्यादींचे सेवार्थ क्रमांक संचालक, लेखा व कोषागारे यांचेकडुन प्राप्त करुन घेऊन या कार्यालयामार्फत सर्व जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांना पुरविण्यात आलेले आहेत. अधिकारी व कर्मचारी यांचे रजिस्ट्रेशन करताना ड्रॉपडाऊन स्वरुपात उपलब्ध असलेले सदरचे सेवार्थ क्रमांक जसेच्या तसे वापरुन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे लॉगईन आयडी तयार करावयाचे आहेत .जर बदलीमुळे, नवनियुक्तीमुळे किंवा अन्य कारणामुळे एखाद्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचा सेवार्थ क्रमांक उपलब्ध होत नसल्यास त्या अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या पगाराच्या स्लीपवरुन (पे स्लीपवरुन) त्यांचा सेवार्थ क्रमांक घेण्याबाबत सहसंचालक ,(रिफॉर्मस् ) संचालक लेखा व कोषागारे कार्यालय यांनी ई-मेल संदेशाने कळविले आहे. त्या प्रमाणे ज्या अधिकारी कर्मचा-यांचे सेवार्थ क्रमांक या कार्यालयाकडून पुरविले नसतील त्यांचे सेवार्थ क्रमांक त्या अधिकारी,कर्मचारी यांच्या पगार स्लीप वरुन घ्यावेत किंवा त्या अधिकारी कर्मचारी यांचेशी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांचे सेवार्थ क्रमांक प्राप्त करुन घ्यावेत व रजिस्ट्रेशनची कार्यवाही पूर्ण करावी. संबंधित सर्व अधिकारी किंवा कर्मचारी यांचा सेवार्थ क्रमांक योग्य रीतीने आज्ञावलींमध्ये भरले जातील याची खबरदारी रजिस्ट्रेशन करणा-या अधिकारी यांनी घ्यावी.

**II) पासवर्ड तयारकरणे :-**

रजिस्ट्रेशन दरम्यान संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांनी ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींमध्ये लॉगईन होण्यासाठी त्यांचे पासवर्ड तयार करावयाचे आहेत. तयार केलेले पासवर्ड हे स्ट्रॉंग असतील याची संबंधीतांनी पुर्ण खबरदारी घेणे आवश्यक आहे.

पासवर्ड तयार करताना खालील बाबींचा प्रामुख्याने विचार करावा.

१. पासवर्ड हा ६ ते १२ कॅरॅक्टरचा असावा.
२. पासवर्ड हा ' अल्फा- न्युमेरिक ' म्हणजेच अंक व अक्षरे यांचे मिश्रण असलेला असावा.
३. पासवर्डमध्ये कमीतकमी एकतरी स्पेशल कॅरॅक्टर(@, # ,$ ,% , ^ , & , * , ईत्यादी) असावे.
४. पासवर्डमध्ये कमीतकमी एकतरी कॅपीटल अक्षर असावे.

संबंधीत अधिकारी,कर्मचारी यांना सदर लॉगईन आयडी व पासवर्डचा वापर करुन ई चावडी व ई-फेरफार या आज्ञावलींचा अधिकृत वापर करता येणार आहे.

**III) हाताच्या बोटांचे ठसे नोंदविणे :-**

रजिस्ट्रेशन दरम्यान संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्या हातांच्या बोटांचे ठसे बायोमेट्रीक डिव्हाईसचा वापर करुन आज्ञावलींमध्ये नोंदवावयाचे आहेत.

उजव्या व डाव्या हातांचे अंगठा ,तर्जनी व मधले बोट या बोटांचे ठसे आज्ञावलीमध्ये नोंदवावयाचे आहेत.

त्यासाठी वरील प्रत्येक बोट प्रथमत: एकदा बायोमेट्रीक डिव्हाईसवर ठेवुन नोंदवावे. नंतर ते उचलावे व परत दुस-यांदा तेच बोट ठेवुन पुन्हा नोंदवावयाचे आहे.

सदर नोंदविलेल्या ठश्यांचा वापर करुन तलाठी व मंडल अधिकारी यांना फेरफार नोंदी मंजूर करणे ईत्यादी कार्यवाही करता येणार आहे.

राज्यातील सर्व तलाठी, मंडल अधिकारी,डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर,डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट यांचे ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींमध्ये रजिस्ट्रेशन करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

**१) डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट यांचे रजिस्ट्रेशन :-**

१.१ डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट यांचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य)पुणे कार्यालयातील वरीष्ठ अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

१.२ त्यांचे मार्फत डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट यांचे ई-चावडी व ई-फेरफार या आज्ञावलींमधील रजिस्ट्रेशन पुर्ण करण्यात आले आहे.

**२) डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांचे रजिस्ट्रेशन :-**

२.१ ई-चावडी व ई-फेरफार या आज्ञावलींची अंमलबजावणी करताना तालुका पातळीवर करावयाच्या कार्यवाही स्वत:च्या नियंत्रणाखाली पार पाडणे,कार्यवाहीवर देखरेख ठेवणे,ई-फेरफार व ई-चावडी आज्ञावलींच्या वापरासाठी तालुक्यातील सर्व मंडल अधिकारी व तलाठी यांचे आज्ञावलींमध्ये रजिस्ट्रेशन करणे,कर्मचा-यांच्या बदल्या झाल्यानंतर त्याप्रमाणे आज्ञावलींतील रजिस्ट्रेशन बदलणे, ७/१२ चा संगणकीकृत डाटा हाताळणे ईत्यादीसाठी प्रत्येक तहसिलदार कार्यालयात डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांची नियुक्ती कशी करावी,त्यांची पात्रता काय असावी तसेच त्यांची कर्तव्य/जबाबदा-या काय असतील याबाबतची सविस्तर माहिती जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.रा.भू.अ.आ.का.-४/प्र.क्र.२४/२०१३/ डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर/१३ दिनांक २५/०७/२०१३ नुसार देण्यात आल्या आहेत.त्यानुसार डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांनी कार्यवाही करावयाची आहे.

२.२ तहसिल कार्यालयातील महसूल नायब तहसिलदार किंवा निवासी नायब तहसिलदार यांना डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर म्हणुन नियुक्ती करण्याचे आदेश जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांनी पारीत करावेत.

२.३ जिल्हा पातळीवर डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट यांनी जिल्हयातील डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी कार्यक्रम तयार करावा.

२.४ ठरलेल्या कार्यक्रमानूसार डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट यांनी डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांना जिल्हाधिकारी कार्यालयात बोलावून डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांच्या सेवार्थ क्रमांकाचा वापर करुन व त्यांच्या हातांच्या बोटांचे ठसे आज्ञावलींमध्ये नोंदवुन डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांचे रजिस्ट्रेशन करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

२.५ डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट यांनी तहसिलदार व डेटाबेस ॲडमिनीस्ट्रेटर यांना तलाठी,मंडल अधिकारी यांचे ई-चावडी व ई-फेरफार या आज्ञावलींतील रजिस्ट्रेशन कसे करावे या बाबतचे प्रशिक्षण दयावे.

२.६ जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी यांनी डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट यांना डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांचे ई-चावडी व ई-फेरफार या आज्ञावलींतील रजिस्ट्रेशन करण्यासाठी मार्गदर्शन व तांत्रिक सहकार्य करावे.

२.७ डिस्ट्रीक डोमेन एक्सपर्ट यांनी डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांचे ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींतील रजिस्ट्रेशन करण्याची कार्यवाही दिनांक ३१/७/२०१३ पर्यत पुर्ण करावी.

**<u>३ ) मंडल अधिकारी ,तलाठी यांचे रजिस्ट्रेशन :-</u>**

३.१ डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांनी त्यांचे तालुक्यातील सर्व मंडल अधिकारी व तलाठी यांचे ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींतील रजिस्ट्रेशन करणेसाठी कार्यक्रम तयार करावा.

३.२ डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांनी ठरलेल्या कार्यक्रमानुसार मंडल अधिकारी व तलाठी यांना तहसिलदार कार्यालयात बोलावून मंडल अधिकारी व तलाठी यांच्या सेवार्थ नंबरचा वापर करुन व त्यांच्या हातांच्या बोटांचे ठसे आज्ञावलीमध्ये नोंदवुन रजिस्ट्रेशन करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

३.३ तलाठी व मंडल अधिकारी यांचे रजिस्ट्रेशन करताना डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांनी आज्ञावलींचा वापर करुन तलाठी व मंडल अधिकारी यांच्या सजा निहाय गावांचे वाटप करावे.

३.४ अधिकारी कर्मचारी यांच्या बदल्या झाल्यानंतर त्याप्रमाणे रजिस्ट्रेशन करण्यासाठी ट्रान्सफर मॉड्युलचा वापर करावा.

३.५ डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर यांनी ई-चावडी व ई-फेरफार या आज्ञावलींतील मंडल अधिकारी व तलाठी यांचे रजिस्ट्रेशन करण्याची कार्यवाही दिनांक ३१/८/२०१३ पुर्वी पुर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

३.६ जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्याचा एकत्रित अहवाल जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांनादिनांक ५/९/२०१३ पर्यंत सादर करावा.

( चंद्रकांत दळवी )
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य.) पुणे**

प्रत : मा.अप्पर मुख्य सचिव महसुल, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : मा. सचिव माहीती तंत्रज्ञान, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : राज्य सुचना विज्ञान अधिकारी, मुंबई यांना माहितीसाठी.

प्रत : उपसंचालक भुमि अभिलेख,संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण, भूमापन,नागरी भूमापन, एकत्रीकरण, रा.भु.अ.आ.का)पुणे यांना माहिती साठी.

प्रत : उपसंचालक भुमि अभिलेख (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : वरीष्ठ तांत्रिक संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी .

प्रत:-जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख (सर्व) यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

प्रत: डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : उपविभागीय अधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत: जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (सर्व ) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : तहसिलदार (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.